
# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME : I ISSUE: III Oct. - Dec. 2020

ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I


Editor

**Dr. Sadashiv H. Sarkate**

E-mail : powerofknowledge3@gmail.com

www.powerofknowledge.co.in

अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Privileges Of Witnesses Under Evidence Law In India | Dr. V. M. More<br>Padmakar Kashinathrao Dhondge | 1-5 |
| 2 | Exchange and Make Use of Knowledge | Shri. Vijay S. Malekar<br>Dr. Dhananjay W. Deote | 6-9 |
| 3 | Importance of "Total Quality Management" in Academic Libraries | Dr.Kashinath Rama Rathod | 10-12 |
| 4 | The Impact Of Rising Npa On The Banking Business | Dr. Parag M. Joshi | 13-17 |
| 5 | Physico-Chemical Parameter And Ichthyofaunal Diversityof Fresh Water Reservoir Majalgaon Dam In Maharashtra State, India. | Sitaram B. Ingole, | 18-25 |
| 6 | Role of Retailer as a Service Provider in Business | Dr.Songirkar Nitin Bhatu. | 26-29 |
| 7 | Translation of Leo Tolstoy`s Short Story The Coffeehouse of Surat from English into Marathi With a Note on Loss And Gain | Dr.Raut Sunil R. | 30-36 |
| 8 | "A Study of Depression on Mental Health among Post-Graduate College Students" | Dr. Ravindra Ramdas Shinde | 37-40 |
| 9 | Population Growth & Unemployment | Mohamad Mustafa Mujawar<br>Dr.Shivalingappa B.P<br>Pradeep B.S | 41-44 |
| 10 | Psycho social problems of Tuberculosis patients of Chikkamagaluru District | Kirankumar H. M.<br>Dr. Lokesh M. U. | 45-48 |
| 11 | Location Quotient of Rural Population in Beed District | Dr. Jitendra Vitthalrao Ghodke | 49-54 |
| 12 | Dimensions of knowledge | Dr. A. A. Khapre<br>Dr. Dhananjay W. Deote | 55-62 |
| 13 | Challenges Faced By Parents Of Children With Learning Disability | Pradeep .B.S | 63-66 |
| 14 | Green Banking In India | Dr. Ravindra Pundlik Patil<br>Mr. Kamlesh Bhimraj Vispute | 67-70 |
| 15 | Traditionally used plant species to cure wound and bone fracture healing | A.M. Shrirame | 71-76 |
| 16 | Status of English in India as 'Auntie Tongue' | Prof. Prajakta Raut, | 77-81 |
| 17 | History Of Economic Thoughts - Dr. B. R. Ambedkar | Dr. Bhoge Digamber Bhagwat | 82-85 |
| 18 | निवडक पाश्चिमात्य इतिहासकारांचा अभ्यास | प्रा. डॉ. गावंडे के. एस. | 86-88 |

# निवडक पाश्चिमात्य इतिहासकारांचा अभ्यास

प्रा. डॉ. गावंडे के. ए
इतिहास विभा
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालन

## रॉबर्ट आर्म (१७२८-१८०१)

जून १७२८ साली त्रावणकार जवळ अनजेन्गो या गावी राबर्ट आर्मचा जन्म झाला. तो ईस्ट इंडिय कंपनीच्या सदनी नौकरीत इ.स. १७४३ साली रुजू झाला. मद्रासच्या गव्हर्नरच्या कौन्सिलचा सभासद म्हणून त्या १७५४ ते १७५८ या काळात काम केले. तर इ.स. १७७० साली त्याची कंपनीचा इतिहासकार म्हणून नियुक्त झाली. या नियुक्तीमुळे इंडिया हाऊस मधील साधनसामुग्री त्याला उपलब्ध झाली. या साधनांचा उपयोग करुन त्या त्रिखंडात्मक उपरोक्त ग्रंथ लिहिला. यापूर्वी इ.स. १७६३ साली त्याने "History of the military transitior of the British Nation in Indostan" हा ग्रंथ लिहन त्याने भारतीय इतिहास लेखनाला प्रारंभ केला होतो. इ.स. १७८२ साली लिहिलेला Fratments हा संशोधनातील ग्रंथ असला तरी शिवाजीपासून संभाजी पर्यंतचा इतिहास हा मोगलांच्या इतिहासाच्या संदर्भात आला आहे. इ.स, १६७२-१६७७ या काळात भारतात डॉ. जॉन फ्रायर नावाचा एक प्रसिध्द् प्रवासी भारतात आला होता त्यानं शिवाजी महाराजांचा उल्लेख आपल्या लिखाणात केला. त्याच्या कार्याकडे आपले लक्ष गेले असे आर्मने म्हटले आहे. रॉबर्ट आर्मच्या लिखाणाचे मोठेपण म्हणजे शिवाजी व संभाजी विषयी साधनांच्या आधारे लिखाण करणारा तो पहिलाच इतिहासकार होता.

## एम.सी. स्प्रेंगेल (१७४६-१८०३)

"History of the Marathas upto the last treaty with England 17th May 1782." हा मराठयांच्या इतिहासावरील ग्रंथ इ.स. १७८५ साली प्रसिध्द् झाला. मेथिअस ख्रिस्तिआ स्प्रेंगेल हा जर्मन इतिहास लेखक होता. त्याच्या मते -हासाकडे निघालेले मोगल सत्तेचा नि:पात करुन हिंदुस्थानावर आपले प्रभाव निर्माण करण्यात मराठे यशस्वी झाले परंतु मराठयांची सत्ताही वेगाने -हासाकडे गेली. या मुद्याला धरुनच त्याने लिखाण केले. स्प्रेंगेलचा इतिहास अपु-या आणि दुय्यम साधनावर आधारित असल्याने संक्षिप्त झाला आहे व तो फारसा अधिकृत ठरला नाही. थोडक्यात मराठयांचा संक्षिप्त व सर्वसाधारण इतिहास लिहिणे हाच त्याचा मुख्य उददे्श होता.

## एडवर्ड स्कॉट वेअरिंग

इ.स. १८१० साली 'History of Marathas' हा मराठयांच्या इतिहासावरील एडवर्ड स्कॉट वेअरिंगचा ग्रंथ लंडन मध्ये प्रसिध्द् झाला. पुण्याच्या रेसिडेन्सी कार्यालयात काही काळ काम कलेले असल्याने पेशव्यांच्या ग्रंथलयाचा त्याला उपयोग करता आला. मराठी साधनांचा मोठया प्रमाणावर वापर करणज्ञरा पाश्चिमात्य इतिहासकार

असला तरी त्याचे लिखाण शास्त्रशुध्दतेवर आधारित नाही.

## कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ (१७८९-१८५८)

मराठी राज्याच्या उगमापासून पेशवाईच्या अंतापर्यंतचा सलग इतिहास लिहिण्याचे काम ग्रँट डफ या इंग्रज पोलिटिकल रेसिडेंटने केले. ग्रँट डफचा जन्म स्कॉटलंडमधील बॉन्फ या गावी दि. ८ जुलै १७८९ रोजी न्यिकडिन ओनिलच्या मध्यमवर्गीय कुंटुबात झाला. त्याचे वडील जॉन ग्रँट १७९९ साली तो दहा वर्षाचा असताना वारले, आई मागरिट मिटन ही डफ घराण्यातील होती. तिचा भाऊ व ग्रँट डफचा मामा विल्यम डफ १८२४ मध्ये वारला यामुळे डफ घराण्याचे नाव व जमीनजुमला या मायलेकरांना मिळाला. तेव्हापासून अजोळीचे डफ हे नावही त्याच्या पितृक नावापुढे लागले.

ग्रँट डफ वयाच्या सोळाव्या वर्षी लष्करात भरती झाला व इ.स. १८०६ साली मुंबईला आला. येथेच त्याने लष्करी शिक्षण घेतले. गेनेडिअर्स अथवा बॉम्बे नेटिव्ह इनफंट्री या सैन्य तुकडीचा तो अधिकारी बनला. कार्लेवाड येथील लूटारुंच्या मालिया या बालेकिल्ल्यावर हल्ला करण्याची व त्यांचा बंदोबस्त करण्याची कामगिरी त्याने यशस्वी केली. इ.स. १८१० साली तो लेप-टनंट झाला. त्याने फार्सी भाषा आत्महसात केली. तो फलटणींचा फार्सी दुभाषा म्हणून निवडला गेला. यावेळी माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन पुण्यातील पेशवांचा पोलीटिकल रेसिडंट कर्नल क्लोज याचा मदतनीस होता. त्याचे या तरुण व चूणचूणीत लष्करी अधिका-यावर लक्ष गेले. अल्पावधीतच एल्फिस्टन पूणचा रेसिडंट झाला. त्याने ग्रँट डफला पूण्याला बोलावून घेतले व त्याची वर्णी पॉटिंजर ब्रिग्ज आणि चॅपलिनसारख्या निकटवर्तियांमध्ये लावली. कारण एल्फिस्टनला एका कुशल मुत्सदी सैनिकाची आवश्यकता होती ती त्याने डफच्या समावेशने पूर्ण केली. दोघातील स्नेह मैत्री वाढतच गेली. सन १८९७ साली झालेल्या खडकी युध्दात मोठा पराक्रम गाजविला. पुढे काही महिन्यातच पेशवाईचा अस्त झाला. एल्फिस्टनला मुंबईचे गव्हर्नरपद देण्यात आले. ग्रँटला कॅप्टनपद देण्यात आले. कंपनी सरकारने साता-याचे राज्य स्वतंत्र ठेवण्याचा निर्णय घेतला. त्याचा पोलिटिकल रेसिडंट व कर्तबगार अधिकारी म्हणून एल्फिस्टन समोर एकच नाव होते ग्रँट डफ ! अशा रितीने २००० मासिक वेतन व १५०० मासिक भत्ता त्याला मंजूर होऊन तो कंपनीचा विश्वासू अधिकारी बनला. याबरोबरच त्याच्या आईचेही स्पन्पूर्ण झाले की ग्रँट ने कंपनीत मोठा अधिकारी व्हावे. तो साता-यात १८१८ ते १८२२ असा चार वर्ष वास्व्यास होता. प्रतापसिंहाबदद्ल ममता व सहानुभूती डफला होती. त्याने अनहेक सुधारणा सातारा राज्यात घडवून आणल्या. यामुळे तो लोकप्रिय झाला.

छत्रपतींच्या दप्तरखान्यातील अनेक कागदपत्रांचा त्याने अभ्यास केला. वखरी, करीने, कुलकटे, महजरे व तवारिखां याचे तज्ञ मंडळीकडून वाचन करुन घेतले. त्याला मराठीचे ज्ञान चांगले होते. पेशवाईच्या उत्तरार्धातील लिहिल्या गेलेल्या अनेक बखरी त्याला मिळाल्या.